डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ व संलग्न संस्थेतील सुधारीत वेतनश्रेणीत वेतन घेणा-या कर्मचा-यांना दिनांक 1 जानेवारी, 2016 पासून महागाई भत्ता वाढ मंजूर करणेबाबत.

# डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

## अर्थप्रशासन विभाग

वाचा: 1)शासन वित्त विभाग निर्णय क्र.मभवा.2016/प्र.क्र.44/सेवा-9, दिनांक: 01 सप्टेंबर, 2016
2)शासन वित्त विभाग निर्णय क्र.निमवा.2016/प्र.क्र.66/सेवा-4, दिनांक: 07 सप्टेंबर, 2016

## आदेश

क्र.अप्रवि/मभवा/निमवा/2016-17/ 1072 दिनांक : 17/09/2016

शासनाने उपरोक्त शासन निर्णय दिनांक 1 सप्टेंबर, 2016 व दिनांक 7 सप्टेंबर, 2016 अन्वये सुधारीत वेतनश्रेणीत वेतन व निवृत्ती वेतन घेणा-या कर्मचा-यांना दिनांक 1 जानेवारी 2016 पासुन **मुळ वेतन अधिक ग्रेड वेतन** यांच्या एकूण रकमेवर 6 % दराने महागाई भत्ता वाढ मंजूर केली आहे म्हणजेच सध्याच्या 119 % महागाई भत्या ऐवजी वरीलप्रमाणे एकूण वेतनाच्या 125 % महागाई भत्ता वाढ मंजूर केली आहे. शासन निर्णयाच्या अनुषंगाने विद्यापीठातील व विद्यापीठाशी संलग्न अनुदानित संस्थातील कर्मचा-यांना दिनांक 1 जानेवरी, 2016 पासुन उपरोक्त महागाई भत्याची वाढ लागु करण्यात येत आहे.

सदरहू महागाई भत्याची वाढ दिनांक **1 सप्टेंबर, 2016 चे नियमित वेतन देयकात** लागु **करावी. तसेच माहे 1 जानेवारी, 2016 ते 31 ऑगस्ट, 2016 या कालावधीतील महागाई वाढीच्या थकबाकीच्या आहरणाबाबत स्वत्रंतपणे आदेश निर्गमित करण्यात येतील.** 1 सप्टेंबर, 2016 ची महागाई भत्याची देयके माहे **सप्टेंबर-2016 देय ऑक्टोंबर-2016** चे नियमित मासिक वेतन देयकात करावी किंवा त्यापुढील नियमित मासिक वेतन देयकात समावेश करावा मात्र याबाबत पुरवणी देयक सादर करु नये अशी पूरवणी देयके पारित केली जांणार नाहीत.

महागाई भत्ता वाढीच्या अनुषंगाने होणारा वाढीव खर्च हा सन 2016-17 चे मंजूर अनुदानातुन भागविण्यात यावा.

भाकृअप योजनातंर्गत 2016-17 करीता वेतन अनुदानाची मागणी करतांना संबंधीत कार्यान्वियन अधिका-यांनी प्रस्तुत महागाई भत्यात वाढ विचारात घेवून त्यानुसार वेतन अनुदानाची मागणी करावी.

**मा. कुलगरु यांच्या मंजुरीने.**

नियंत्रक
डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,
अकोला

प्रति:1) नियंत्रण अधिकारी(सर्व)/आहरण व संवितरण अधिकारी(सर्व)/विभागप्रमुख(सर्व).

2) प्राचार्य ____________

3) वेतन व लेखाधिकारी, डॉ.पंदेकृवि, अकोला/नागपुर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित.

निवृत्ती वेतन/कुटूंब निवृत्ती वेतन धारकांना **1 सप्टेंबर, 2016** पासुन निवृत्ती वेतनावर सध्याचा महागाई भत्ता दर 119% ऐवजी 125% लागु करणेत येत आहे. माहे **सप्टेंबर-16 देय ऑक्टोंबर-16** चे नियमित मासिक निवृत्ती वेतन देयकात प्रदान करणेत यावी. महागाई भत्ता अदा करण्यासाठी निवृत्ती वेतन अथवा वेतनाचे स्वतंत्र पुरवणी देयके आपण पारित करु नये.

नियंत्रक